# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


---

## महाप्रसादाची नारळवडी बनविण्याच्या कंत्राटाकरीता ई–निविदा मागविण्याबाबत.

---

कंत्राटाचा कालावधी

दि. १ ऑक्टोबर, २०१९ ते दि. ३१ मार्च, २०२० पर्यंत

---

**श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई ४०००२८**

फोन नं. : २४२२४४३८,२४२२२०७२,२४३७३६२६ फॅक्स : २४२२१५५८

**: ई–निविदा सूचना :**

मंदिरातील महाप्रसाद विभागात, महाप्रसादाची नारळवडी बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्यासाठी ई निविदा मागविण्यात येत आहेत. ई निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळास किंवा **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या संकेतस्थळास भेट दयावी.

- ई निविदा प्रसिध्दीचा दिनांक –: शुक्रवार दि. २३ ऑगस्ट, २०१९
- निविदा पूर्व बैठक (Pre-bid Meeting) –: शुक्रवार दि. ३० ऑगस्ट, २०१९, दुपारी १२.०० वाजता
- स्थळ –: तिसरा मजला, मंदिर न्यास कार्यालय
- ई निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक –: बुधवार दि. १८ सप्टेंबर, २०१९ दुपारी १.०० वाजेपर्यंत
- तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ –: गुरुवार दि. १९ सप्टेंबर, २०१९ दुपारी २.०० वाजता
- स्थळ –: तिसरा मजला, न्यास कार्यालय
- मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ –: गुरुवार दि. १९ सप्टेंबर, २०१९ दुपारी ३.०० वाजता
- स्थळ –: तिसरा मजला, न्यास कार्यालय

प्रियांका रं. छापवाले
कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## ६ महिन्याच्या कालावधीकरीता महाप्रसादाची नारळवडी बनविण्याच्या कंत्राटाकरीता अटी व शर्ती

१. ई–निविदेसोबत अपलोड करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीबाबतचे निकष, अटी/शर्ती, महाप्रसादाची नारळवडी बनविण्यासंबंधीची माहिती सोबत दिलेली आहे.

२. ई–निविदेची किंमत/शुल्क रु. २०००/– व बयाना रक्कम रु. १०,०००/– इतकी आहे.

३. ई–निविदा अपलोड करतेवेळी निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कम ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रक्कम कंत्राट करार संपल्यावर ६० दिवसानंतर परत केली जाईल. ई–निविदेची किंमत/शुल्क ना परतावा स्वरुपाचे असेल तसेच बयाना रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय होणार नाही/मिळणार नाही.

४. ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

५. ई–निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बॅकींगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कमेबाबतची पावती प्रत अपलोड करावी.

६. ई–निविदाधारकाने तांत्रिक निविदा (Technical Bid) व बीड ऑफ कोटेशन (BOQ) अशा दोन प्रकारच्या ई–निविदा भरताना काही माहिती अपूर्ण ठेवल्यास/राहिल्यास त्या ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील. अंतिम निर्णय हा श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास यांचेसाठी राखीव असेल.

७. कमी जास्त दराची कोणतीही ई–निविदा स्विकारण्याचा/नाकारण्याचा अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार न्यासाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास बंधनकारक राहणार नाही.

८. निविदाधारकाची मागील वर्षाची उलाढाल कमीत कमी रू. १५ लक्ष असणे आवश्यक आहे.

९. निविदाधारकास नामांकित कंपन्या, हॉटेल्स, रूग्णालये, शासकीय कार्यालये/विभाग वगैरे ठिकाणी स्वयंपाक बनविण्याच्या कामाचा अनुभव असावा.

१०. महाप्रसाद बनविण्याचे काम नियमीत व वेळेतच होण्याकरीता निविदाधारक हा मुंबई, नवी मुंबई व ठाणे या परिक्षेत्रातील असावा.

११. निविदाधारक यांच्याकडे कॅटरींग व्यवसायाचा कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव असावा.

१२. निविदाधारकाने मुंबई परिक्षेत्रात मागील २ वर्षापासून काम चालू असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक असेल.

१३. निविदाधारकाचे मुंबईत ज्या संस्थेमध्ये काम चालू आहे त्या संस्थेकडून काम समाधानकारक करीत असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते जोडणे आवश्यक असेल.

१४. पूर्ण माहिती भरलेली ई–निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. मुदतीत न आलेल्या तसेच अपूर्ण ई–निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. ई–निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

१५. ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावती, बयाना रक्कम जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावती, शासन मान्य नोंदणी दाखला, आयकर नोंदणी पॅन कार्ड, जी एस टी नोंदणी प्रमाणपत्र तसेच जीएसटी भरल्याचे विवरणपत्र, मागील ३ वर्षांचे आयकर विवरणपत्र, भागीदार कागदपत्रांची साक्षांकित झेरॉक्स प्रत (आवश्यकतेनुसार), सन २०१८–१९ चा वार्षिक उलाढालीबाबत लेखा परिक्षण अहवाल, मागील तीन वर्षातील उलाढालीची माहिती, सद्या काम चालू असलेल्या ठिकाणाची माहिती, मागिल तीन वर्षात केलेल्या कामासंबंधीत कागदपत्रे, प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत इ. कागदपत्रे अपलोड करावीत. त्यानंतर आर्थिक ई–निविदा उघडण्यात येईल.

२.

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com




१६. ज्या दिवशी तांत्रिक ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

१७. महाप्रसादाची नारळवडी बनविण्याचे कंत्राटाचा कालावधी सहा महिन्यांचा असेल. कंत्राटाचा कालावधी कामाचे आदेश दिलेपासून ते ३१.०३.२०२० अखेरपर्यंत वैध असेल. कंत्राट कालावधीमध्ये कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास तसेच निकृष्ट दर्जाचे काम अथवा कामामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास, महाप्रसादाची नारळवडी बनविण्याच्या कामाचे कंत्राट तात्काळ रद्द करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

१८. ई–निविदा मंजूर झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत निविदाधारकाने कंत्राट कालावधीमध्ये करावयाच्या कामाच्या मजुरी रक्कमेच्या ५ टक्के रक्कमेची बँक गॅरेंटी न्यासास सादर करावी. बँक गॅरेंटी राष्ट्रीयकृत वा अनुसूचित बँकेची द्यावी लागेल.

१९. कंत्राट कालावधीमध्ये करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे.

नारळवडी महाप्रसाद

अ) नारळवडी बनविण्याकरीता नारळाचा कीस व साखर वापरण्यात येते.

ब) महाप्रसादाची नारळवडी बनविण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालाचा वजनानुसार तपशील खालीलप्रमाणे –

| महाप्रसाद नारळवडी | |
|---|---|
| **कच्चा माल तपशील** | **वजन** |
| नारळाचा कीस | ७५ किलो |
| साखर | ५० किलो |
| **एकूण वजन** | **१२५ किलो** |

क) १००किलो नारळवडी बनविण्याकरीता वापरण्यात येणारा नारळाचा कीस व त्याच्या वजनाच्या २/३(दोन तृतिआंश) इतकी साखर वापरण्यात येते. (उदा. ७५ किलो नारळाचा कीस यानुसार ५० किलो साखर)

ड) १. नारळवडी नग – प्रति किलोत अंदाजे ४० नग इतके बनविण्यात येतील.

२. नारळवडीचा आकार – लांबी ४.५ से. मी., रूंदी ४.५ से. मी., उंची (जाडी) १.५० ते १.७५ से. मी. इतकी असेल.

३. नारळवडीचे वजन – प्रति नग २५ ग्रॅम इतके असेल.

इ) **खालीलप्रमाणे नारळवडी महाप्रसाद बनविण्यात येईल.**

| अ.क्र. | कामाचा तपशील | प्रति नग वजन (कि.ग्रॅ.) | प्रमाण (प्रतिदिन दिन) नग व त्याचेवजन |
|---|---|---|---|
| १ | महाप्रसादाची नारळवडी | २५ ग्रॅम | नग २०,००० नग व वजन ५०० किलो |

टीप : वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकते नुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

२०. नारळवडी महाप्रसाद बनविण्याकरीता लागणारे नारळ हे लहान, मोठे आकाराचे तसेच कमी जास्त प्रमाणात किशीचे असल्यामुळे नारळ फोडण्यासाठी अथवा नारळाची किशी सोलण्यासाठी वेगळी अदायगी दिली जाणार नाही.

२१. महाप्रसादाची नारळवडी बनविण्यासाठी गॅस शेगडी, गॅस, नारळ, नारळ किसण्याची मशीन व साखरेचा पाक मिक्स करण्याची मशीन न्यासातर्फे कंत्राटदारांस पुरविण्यात येईल.

२२. नारळवडी बनविण्यासाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या प्रतिदिन ७ पेक्षा अधिक होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

२३. कंत्राट कालावधीमध्ये महाप्रसादाची नारळवडी तयार करताना कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे कच्च्या मालाचे, तयार मालाचे किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास न्यासामार्फत आपणाकडून नुकसान भरपाई करून घेण्यात येईल.

२४. महाप्रसादाची नारळवडी बनविण्याकरीता लागणारा कच्चा माल, भांडी (झारी सोडून), गॅस शेगडी, गॅस न्यासातर्फे कंत्राटदारास पुरविण्यात येईल.

२५. कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा दाखला (Health Card), कायम रहिवाशी दाखला व ओळखपत्र कंत्राटदाराने न्यासास देणे आवश्यक आहे.

२६. कंत्राटदाराकडील सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश (युनिफॉर्म), हॅन्डग्लोज, शॉवर कॅप, ॲपरॉन देणे बंधनकारक असेल. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

२७. कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

२८. जीएसटी, व्यवसाय कर, भ. नि. नि. योजना व अन्य कोणत्याही प्रकारच्या करासंदर्भातील जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

२९. कंत्राटदाराने दररोज स्वयंपाक गृहासह संपूर्ण मजल्याची साफसफाई करणे आवश्यक असेल.

३०. कंत्राट कालावधीत कंत्राटदाराने कच्च्या मालासह स्वयंपाक गृहातील वस्तू व मालमत्ता काळजीपुर्वक व जबाबदारीने वापरणे बंधनकारक असेल.

३१. कंत्राट कालावधीत नमुद केलेल्या महाप्रसाद बनविण्याच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात महाप्रसाद बनविण्यात आल्यास सदर वाढीव काम मान्य दराने करणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

३२. गर्दीच्या दिवशी (शनिवार, रविवार, मंगळवार, सार्वजनीक सुट्टी तसेच उन्हाळी, दिवाळी व नाताळ या शालेय सुट्टया) किंवा उत्सवामध्ये(संकष्टी चतुर्थी, अंगारकी संकष्टी चतुर्थी, भाद्रपद श्री गणेश चतुर्थी उत्सव व माघी श्री गणेश जयंती महोत्सव) महाप्रसादाची प्रचंड मागणी असते. अशावेळी २ दिवस अगोदरपासून जादा प्रमाणात महाप्रसाद बनविण्याचे काम करणे तसेच त्याकरीता लागणाऱ्या जादा कामगारांची व्यवस्था करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

३३. कामाचे कंत्राट अर्धवट सोडून गेल्यास न्यासास होणाऱ्या नुकसानाची भरपाई करुन देणे बंधनकारक असेल.

३४. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. कंत्राटदाराने महाप्रसाद बनविण्याचे काम करावयाचे नाकारल्यास अथवा काम न केल्यास आपली पूर्णत:/अंशत: बयाना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. त्याबाबत न्यास व्यवस्थापनाचा निर्णय अंतिम राहील.

३५. कंत्राट आदेश व मजूरी बिलाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदर व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत राहील.

४.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

३६. न्यासाने महाप्रसाद बनविण्याचे दिलेले काम वेळेत न केल्यास, लेखी अथवा मौखिक आदेशानुसार दिलेल्या कामाची पुर्तता न केल्यास, तसेच असमाधानकारक किंवा दर्जाहीन काम केल्यास कंत्राटदारास दिलेले कंत्राट कोणतीही पुर्वसूचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल. याबाबत न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहिल.

३७. ई–निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांत समक्ष येवून स्टॅम्पपेपरवर करारनामा करून देणे निविदाधारकास बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास कंत्राटदाराने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

३८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

३९. मुळ निविदा, निविदाधारकाबाबतची माहिती, ई–निविदेसोबत जोडावयाची कागदपत्रे, ई–निवेदेची किंमत/शुल्क मुळ भरणा पावती व बयाना रक्कमेची मुळ भरणा पावती तसेच इतर कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावी.

४०. ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड कलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

४१. संकेतस्थळाच्या माहितीकरीता **टोल फ्री क्र.** ०१२०–४२००४६२, ४००१००२, ४००१००५, ६२७७७८७.

(प्रियांका रं. छापवाले)
कार्यकारी अधिकारी

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


## ई–निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कम

| अ. क्र. | कामाचा तपशील | वर्षभराकरीता होणारे काम (अंदाजे) | चालू वर्षाच्या दराने मजुरी रक्कम रु. | निविदेची किंमत/शुल्क | बयाना रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| २ | महाप्रसादाची नारळवडी | ७२,००० किलो | रु. ५,९४,००० /– | रु. २,०००/– | रु. १०,०००/– |

टिप : वर नमूद कामाचे प्रमाण हे अंदाजीत आहे. त्यामध्ये घट किंवा वाढ होऊ शकते.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## निविदाधारकाबाबतची माहिती

(१) संस्थेचे/फर्मचे नांव/व्यक्तीचे नांव :————————————————

अ. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :————————————————

————————————————

————————————————

ब. दूरध्वनी क्र. :————————————————

क. भ्रमणध्वनी (मोबाईल) :————————————————

ड. फॅक्स क्र. :————————————————

इ. ई–मेल :————————————————

(२) संपर्कासाठी व्यक्तीचे नांव (हुद्दयासह) :————————————————

अ. भ्रमणध्वनी (मोबाईल) :————————————————

(३) सद्या कार्य सुरू असलेल्या संस्थेचे नांव :————————————————

व पत्ता ————————————————

————————————————

(४) जीएसटी नोंदणी क्र. :————————————————

(५) आयकर नोंदणी पॅन क्र. :————————————————

निविदाधारकाची सही व शिक्का

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

## लिफाफा क्र. १ तांत्रिक निविदा (Technical Bid)

| | | |
|---|---|---|
| १. | किंमत/शुल्क जमा केलेल्या पावतीची छायाप्रत : | ☐ |
| २. | बयाणा रक्कम जमा केलेल्या पावतीची छायाप्रत : | ☐ |
| ३. | शासन मान्यता असलेले नोंदणी प्रमाणपत्र : | ☐ |
| ४. | आयकर नोंदणी पॅन कार्ड छायाप्रत : | ☐ |
| ५. | जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र छायाप्रत : | ☐ |
| ६. | भागीदार कागदपत्रांची साक्षांकित छायाप्रत : | ☐ |
| ७. | सद्या ज्या संस्थेमध्ये काम चालू आहे त्या संस्थेकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र : | ☐ |
| ८. | अनुभवाच्या तपशीलाची छायाप्रत : | ☐ |
| ९. | मागील ३ वर्षांचे आयकर विवरण/जमाखर्च/उलाढाल तपशील :<br>(वर्ष २०१६–२०१७, २०१७–२०१८, २०१८–२०१९) | ☐ |
| १०. | निविदाकार/संस्था/संघटनेच्या कामाचे क्षेत्र,<br>कार्यरत कुशल मजूर/कर्मचारी यांची<br>संख्या व माहिती याबाबतचा थोडक्यात सारांश : | ☐ |

**टिप :– ई–निविदेद्वारे अपलोड केलेल्या वरील सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.**

निविदाधारकाची सही व शिक्का

# हमीपत्र

**प्रति,**
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

मी/आम्ही ———————————————————————————— खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. निविदा अटी – शर्ती नुसार महाप्रसादाची नारळवडी बनविण्याचे काम आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता वर्षभर करू.

३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये जीएसटी वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

४. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालवधीत न्यासाने विहीत केल्यानुसार बयाना रक्कम व बॅक गॅरंटी देण्यास आम्ही बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम यांनी आमच्या काम करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरूध्द केलेली नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

दिनांक :    /    /२०१९

**निविदाधारकाची सही व शिक्का**

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## लिफाफा क्र.२

## मूळ निविदा (वाणिज्जीक– Commricial)
## बीड ऑफ कोटेशन (BOQ)

निविदेमध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

१) निविदाधारकाचे नाव :––––––––––––––––––––––––

२) निविदाधारकाचा कायम पत्ता :––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––

३) जीएसटी नोंदणी क्रमांक :––––––––––––––––––––––––

| अ. क्र. | कामाचा तपशील | वजन (प्रति नग) | प्रमाण (प्रतिदिन दिन) नग व त्याचे वजन | न्यासास अपेक्षित कमाल दर अथवा त्यापेक्षा कमी दर (कर वगळून) | कंत्राटदाराचे दर (कर वगळून) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नारळवडी महाप्रसाद | २५ ग्रॅम | नग २०००० वजन ५०० किलो | रु. ९ /– (एक किलो तयार नारळवडीकरीता) | रु. ........ पै. ........ (एक किलो तयार नारळवडीकरीता) |

टीप :

१. वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकते नुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

२. वर नमुद मजूरी दरामध्ये न्यासाने विहीत केलेल्या अटी व शर्तीनुसार स्वयंपाक गृहासह संपूर्ण मजल्याच्या साफ सफाईचा खर्च समाविष्ट करून दर नमुद करण्यात आलेले आहेत.

३. महाप्रसादाची नारळवडी बनविण्यासाठी प्रति किलो तयार नारळवडीकरीता कंत्राटदाराचे दर आधारीत असतील.

निविदाधारकाची सही व शिक्का